ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VIII Issue - I Marathi Part - II January - March - 2019

Peer Reviewed Referred and UGC Listed Journal

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned with CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - II



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १४ | मार्क्सवादी दृष्टीकोन स्वरुप, वैशिष्ट्ये, सामर्थ्य आणि मर्यादा<br>**डॉ. प्रा. रामकृष्ण ज्योतिबा प्रधान** | ६७-७१ |
| १५ | ग्रामीण साहित्यसमीक्षा : काही निरीक्षणे<br>**शंकरराव प्रभाकर माने** | ७२-७६ |
| १६ | स्त्रीवाद व स्त्रीवादी कविता<br>**प्रा. डॉ. सदाशिव सरकटे** | ७७-८१ |
| १७ | समीक्षा : संकल्पना, स्वरुप आणि समीक्षेपुढील आव्हाने<br>**प्रा. मधुकर जाधव** | ८२-८४ |
| १८ | सौंदर्यवादी साहित्य समीक्षा<br>**प्रा. भैय्या डी. पाटील** | ८५-९१ |
| १९ | आदिबंधात्मक समीक्षेचे कार्य स्वरुप<br>**डॉ. एम. ए. कव्हळे** | ९२-९६ |
| २० | आदिबंध : संकल्पना<br>**डॉ. रेखा जगनाळे** | ९७-९८ |
| २१ | समीक्षा, संकल्पना आणि स्वरूप<br>**सोनवणे आण्णासाहेब हंबीराव**<br>**कदम पुजा शिवाजी** | ९९-१०१ |
| २२ | १९९० नंतरच्या ग्रामीण साहित्यातील जातीयतेचे बदलते स्वरूप<br>**डॉ. लहुकुमार खंडाळे** | १०२-१०५ |
| २३ | समीक्षा : संकल्पना आणि स्वरुप<br>**भाग्यश्री माताडे** | १०६-१०९ |
| २४ | समीक्षा, संकल्पना आणि स्वरुप<br>**भालेराव राजनंदीनी कैलास** | ११०-११५ |
| २५ | दलित साहित्य समीक्षा<br>**डॉ. सुधाकर पंडितराव बोथीकर** | ११६-११९ |



Scanned with CamScanner

VOLUME - VIII, ISSUE - I - JANUARY - MARCH - 2019
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# १६. स्त्रीवाद व स्त्रीवादी कविता

**प्रा. डॉ. सदाशिव सरकटे**
मराठी विभाग प्रमुख, कला व विज्ञान महाविद्यालय, शिवाजीनगर, गढी, ता. गेवराई.

साहित्याचे घाट, व्यक्तिरेखा लेखनाची दिशा, शैली, शब्दरचना इ. अंगांमधून लेखकाबरोबर तो ज्या तऱ्हेच्या सामाजिक परिसरातून आला, त्या परिसराचेही स्वच्छ चित्र त्या साहित्यात उमटत असते. काव्य या प्रकारात व्यक्तिगत उत्कट अविष्काराला विशेष महत्त्व असून हा कवी आपली काव्य परंपरा भोवतालचा समाज यांच्या चौकटीत व्यक्त करतो. मराठी काव्यपरंपरेचा अभ्यास हा सामाजिक स्थित्यंतरांचाही अभ्यास ठरू शकतो, यातील स्त्रीवादी विचारांच्या मराठी कवितेचा अभ्यास करताना या विचारांची चौकट प्रथम आपणास निश्चित करणे गरजेचे आहे. त्यानंतर स्त्री कवींच्या काव्यातून व्यक्त होणाऱ्या स्त्री व पुरुष यांची दखल घेता येते. मराठीतील आजच्या काही स्त्रीवादी कवितांचा परामर्श हा या अंगांने येथे घेणे महत्त्वाचे आहे.

स्त्रीवादी या भूमिकेत पुढील काही मुद्दे हे गृहीत तत्त्वे म्हणून अभ्यासता येतात. १) स्त्रीने लिहिलेली कविता म्हणजे स्त्रीवादी कविता नव्हे. २) पुरुषाने स्त्री या विषयावर लिहिलेली कविता म्हणजे स्त्रीवादी कविता नव्हे !

इथे स्त्रीचे कौतुक, उत्कटप्रेम, देवतेसमान पूजन, निर्भत्सना, टवाळी, स्त्री हे वासनांचे आगार असून, तिच्यापासून दूर राहण्याचा सल्ला, पत्नी, आई, गृहिणी या भूमिकांचे गायलेले गोडवे हे स्त्रीविषयक काव्यांचे मोठ्या प्रमाणात घाऊक विषय म्हणता येतील, पण पुरुष कवी मोठ्या संख्येने वर्षानुवर्षे या विषयावर कविता लिहित आहेत. स्त्री कवीही आपल्या या भूमिका मान्य करुन कविता लिहितात. स्त्रीवादी कविता स्त्रीच्या आदिमाया ते देहस्विनी या दोन्ही टोकाच्या भूमिकांचा आज धिक्कार करते. या नकारात्मक पवित्र्याला महत्त्व देऊन स्त्रीवादी कविता होकारात्मक भूमिका पुढीलप्रमाणे बजावते.

या समाजाने परंपरा, रूढी यातून बनविलेल्या स्त्रीच्या म्हणून असलेल्या खास भूमिकांमध्ये अडकून न पडण्याचा निश्चिय, पत्नी, आई व गृहिणी या खास स्त्रीच्या म्हणून हजारो वर्षे मान्यता गेलेल्या भूमिकांमुळे स्त्रीला कुटुंबात व पर्यायाने समाजात दुय्यमत्वाची भूमिका बजवावी लागते. या तिन्ही भूमिका ती यशस्वी निभावते; पण तिच्या मानवी क्षमतांवर इथे मर्यादा येतात. तिचे विश्व सिमीत केले जाते. तिच्याकडून ठराविक साच्याच्या आदर्शांची अपेक्षा ठेवली जाते, या भूमिका केवळ 'बाई' या शारीरिक निकषांवर आधारित आहेत, त्या सामाजिक प्रवाहांपासून स्त्रीला वंचित ठेवले जाते. पुरुषांच्या वर्चस्व गाजविण्याच्या वृत्तीला पोषक ह्या गोष्टी ठरतात, म्हणून या भूमिकांच्या बेड्यांतून स्त्री पलिकडे जाऊ इच्छिते. इथे या भूमिका नाकारायच्या म्हणजे कुटुंबजीवन नाकारायचे वा उद्धस्त करायचे असा विचार नसून या भूमिका डोळसपणे स्वीकारणे व याच भूमिका हे आपले कार्यक्षेत्र न मानता, त्यांच्यापुढे जाऊन व्यक्ति म्हणून सामाजिक क्षेत्रात आपल्या क्षमतांचा पूर्ण वापर करायचा अशा दुहेरी विधायक भूमिका आहेत. पारंपरिक भूमिकांमधील मर्यादा, ढोंग यांची जाणीव होणे, या भूमिकांना असलेल्या फाजील महत्त्वाला किंमत न देणे, या भूमिका लादणाऱ्यांचे जोखड भिरकावून देणे, या भूमिकांनी निर्माण केलेल्या आदर्शांच्या चौकटींचा



Scanned with CamScanner

तकलादूपणा दाखवणे, या भूमिकांतून तयार झालेल्या स्त्रीपणाच्या दंतकथांना आव्हान देणे, जुन्या दंतकथांचे नवीन कार्य लावणे व पारंपरिक स्त्री प्रतिमा नाकारुन व्यक्ती म्हणून आपली नवी प्रतिमा सिद्ध करणे इ. अनेक बारीक-सारीक अंगोपांगातून स्त्रीवादी कवितेचे विषय या प्रथम गृहीत तत्त्वातून अभिव्यक्त होतात.

कुटुंब, समाज या दोन्ही पातळ्यावर होणाऱ्या स्त्रीच्या शोषणाची जाणीव असणे व हे शोषण थांबविणारी व त्याला वैचारिक अधिष्ठानाने आव्हान करणारी भूमिका घेणे, हे स्त्रीवादाचे दुसरे गृहीत तत्त्व म्हणता येते. स्त्रीवादी दृष्टीकोनातून पुरुष व स्त्री हे दोन्हीही घराचे व समाजाचे सारखेच नागरीक असल्याने, स्त्रीच्या दुय्यमपणाला आव्हान देऊन, तिला तिचे स्वतःचे महत्त्वाचे स्थान निर्माण करुन देण्यासाठी झगडणे, हे एक महत्त्वाचे कार्य आहे. स्त्रीचा विविध पातळ्यांवर होणारा कोंडमारा प्रभावीपणे काव्य माध्यमातून व्यक्त करणे, स्त्रीच्या दुय्यम स्थानाची जाणीव जागृत करणे, पुरुषाच्या स्वामित्वाच्या हक्काचा फोलपणा दाखवणे, बौद्धिक व शारीरिकदृष्ट्या स्त्री, पुरुषापेक्षा कमकुवत नाही, हे सिद्ध करणे वगैरे अनेक दृष्टीकोनातून अशी स्त्रीवादी कविता आपला आशय व्यक्त करु लागते. उदा.

"मी म्हणजे केरवारा, स्वैपाकपाणी
मी म्हणजे आवक जावक बिले पावत्या,
मी म्हणजे बौद्धिकांची रतीब-गाळणी
मी म्हणजे हेच काही चैतन्याची चमक नाही
चालता बोलत्या पाषाणाला सुख नाही, दुःख ही नाही"

स्त्रीला दिलेली चालत्या-बोलत्या पाषाणाची उपमा संसाराला तिचं ओशाळलेपण व्यक्त करते. कष्ट करणारी स्त्री, नोकरी करणारी स्त्री, घर सांभाळणारी स्त्री, जोपासणारी गृहलक्ष्मी ही घरासाठी आयुष्य वेचताना स्वतःच सारी काही गमावून बसते. याचं विरोधात्मक चित्रण 'मध्यमवर्गीय गार्गी' या कवितेत पहावयास मिळते.

इंदिरा संतांच्या 'चित्कळा' (१९८९) या कवितासंग्रहात मात्र स्त्रियांच्या दडपलेपणाचे वा स्त्री संबंधातील अन्य विषय येत नाहीत, पण त्यांच्या काव्याचे वैशिष्ट्ये असे की, गेल्या ५० वर्षात बदललेल्या, स्त्री जीवनाला कुठे ना कुठे त्या समजून घेण्याचा प्रयत्न करतात. विशेषतः 'बाहुल्या' (१९७२) या काव्यसंग्रहात आसपासच्या नोकरी करणाऱ्या, स्त्रीच्या हालअपेष्टांचे चित्रण पहावयास मिळते.

संजीवनी मराठे यांची स्त्री ही इतर तत्कालीन स्त्री प्रमाणेच प्रणयिनी आहे. त्यामुळे ती संसारासाठी समर्पणाची भूमिका घेते. उदा.

"वडिल जनांचे चरण चुरावे
पतिसेवेला तत्पर व्हावे
नणंद-जावे सवे रमावे
छंद असा घेतला (विठाई !)"



Scanned with CamScanner

अर्थात इथे स्त्रीचे कुटूंबातील स्थान कसे बरोबर व्यक्त झाले ते पहायला मिळते.

आधुनिक कवितामधून स्त्रीने मागितलेल्या समानतेची जाणीव अभिव्यक्त होते, पण संजीवनी मराठे यांचा स्थायीभाव मात्र म्हणजे -

'हे हात एकदा तू मागून घेतले, हातावरी तुझ्या मी काळीज ठेवले'

अर्थात सर्मपित प्रीतीजीवनाच्या भूमिकेत जीवनाचे सार्थक म्हणजे स्वतःला झोकून देणे, सर्वस्वाचं दान करणं, ही शक्तीच पुरुषाला कसे जिंकते ? या स्वप्नात ही कविता रमते, पण पुढे हीच कविता स्त्रीचं दुःखही अभिव्यक्त करते, ते म्हणजे

"सीतेपुढे एकच ओढली रेषा लक्ष्मणाने
तिने ती ओलांडली आणि झाले रामायण -
आमच्यापुढे दाही दिशा लक्ष्मण रेषा
ओलांडाव्याच लागतात -
रावणांना सामोरे जावेच लागते !"
एवढेच कमी असते.
कुशीत घेत नाही भुई दुभंगून !
(लक्ष्मणरेषा - आकाशवेडी)

'श्रावणमेघ' या कवितासंग्रहात कुटूंबातील तृप्त एकाकी वृद्ध स्त्रीच्या भावावस्था पद्माबाईनी टिपल्या असून. या अवस्थेत मात्र त्या एक पाऊल पुढे जाऊन, स्वतःला शोधण्याचा ध्यास घेताना दिसतात. उंबऱ्यावरच माप ओलांडून घरात आलेली स्त्री, भुईसाठी केरसुणी होते, रांगोळी होते, चुलीसाठी लाकूड होते. जात्यासाठी धान्य होते, पणती होऊन घर उजळते. सून होते, बायको होते, पण स्वतःला हरवून ती बसते, ही सगळी सोंग उतरवून 'माझी मला शोधू दे' अशा अंतर्शोधाचा ध्यास 'मी घरात आले' या कवितेत पहावयास मिळते. 'अखेर स्त्री ही एक वस्तू आहे' ही वस्तुस्थिती त्यांना बोचते.

"कसं झुगारु वस्तुपण
कळकळते, तळमळते -
कातडीलाच चिकटलेलं
फाडून टाकायला तडफडते"
(वस्तू - श्रावणमेघ)

अशाप्रकारे पद्माबाईच्या काव्यातल्या स्त्रीवादी जाणीवाचं सामर्थ माणूसपणाची जाणीव करुन देणार आहे, तर अनुराधा पोतदार यांच्या कवतेतली स्त्री ही व्यक्ती नाहीच तर ती कविता आहे. 'लावण्याच्या भावलिपीतून बोलणारी, तिच्या मौनाला शब्द फोडणारी ती कविता आहे. स्त्रीमन हे संवेदनशील, हळवे, स्वतःचे जीवन स्वतः फुलवायला असमर्थ असे आहे.



Scanned with CamScanner

१९७९ साली प्रसिद्ध झालेलं मलिका अमरशेखांचा 'वाळूचा प्रियकर' हा काव्यसंग्रह म्हणजे स्त्री शरीराच्या जाणीवा खणखणीत, स्पष्ट शब्दात अभिव्यक्त करणारा आहे. १९८७ साली प्रसिद्ध झालेला निरजा यांचा 'निरन्वय' हा काव्यसंग्रह म्हणजे 'प्रेम' या विषयाकडेही अनेकविध स्वतंत्र दृष्टिकोनातून पाहता येतो. स्त्रीचे शारीरिक व मानसिक पातळीवरचे होणारे मुकाट शोषण, एखाद्या अनुभवाच्या चटक्यातून जागं होणारं स्त्रीत्व आणि स्वत्त्व याचं भान या कवयित्रीला आहे.

"गडद अंधारात सावलीसारखे, मागे लागलेले हे भोग
तू उंच झाडाच्या शेंड्यावर, आलेलं लालचुटूक फळ
आणि हा किडा डबक्यातला, पंख फुटायच्या प्रतिक्षेत,
बुंध्याशी बसून तुझ्याकडे पाहात होता
त्यावेळी, आज तू दिलेलं हाडूक चघळत -
भुंकतो आहे तुझ्याच दारात....."

इथे स्त्रीच्या जीवनातली असमानता व प्रेम या कल्पनेतला भ्रमनिरास व्यक्त होतो आहे. स्त्री एकीकडे देहस्विनी म्हणून पुरुषांच्या पापी वासनेच ती भक्ष्य बनते; तर दुसरीकडे गांधारीसारखी म्हणून पुत्रांच्या पापांकडे दुर्लक्ष करुन आईपण मिरवते, स्त्रीचा हा दृष्टिकोन दुटप्पी वाटतो.

"तू समजतेस तेवढी, चांगली नाहीस तू
तू खेळणं आहेस, अनेकांच्या हातातलं"

अशी आत्मनिर्भत्सना हाही स्वतःला समजून घेण्यातलाच एक भाग असून स्त्रीच्या सार्वकालीन शोषणाची एक काव्यात्मक कल्पना 'स्वयंवर' या कल्पनेच्या नव्या दृष्टीतून व्यक्त होते.

१९८८ मध्ये प्रसिद्ध झालेल्या स्त्रीसूक्त या आश्वीनी धोंगडे यांच्या काव्यसंग्रहात प्रभावानं व्यक्त झालं की, स्त्रीची खोटी स्वप्नील रुपं दाखवणारी रोमँटिक कविता, फॅशन शो व जाहिरातीवरुन होणारं स्त्रीदेहाचं प्रदर्शन, सिनेमातून दिसणाऱ्या स्त्रीचं विकृत चित्रण, कथा-कादंबऱ्यातील स्त्री देहाची अतिशयोक्त काव्यात्म वर्णने, यांच्या पार्श्वभूमीवर वास्तवात अतिशय 'स्वस्त' आणि बाजारू झालेली आजची स्त्री, या कवितामधून वास्तवाच्या पातळीवर प्रथम चित्रित झालेली आहे. नोकरीच्या निमित्ताने घराबाहेर पडल्यावर समाज 'स्त्री'कडे 'बाई' म्हणूनच पाहतो. अर्थात कुणीही तिला नजरेनं शोषतं, कोणी चुटपुटत्या स्पर्शानं, कोणी गप्पा मारुन, कोणी चर्चा करुन, अशा वेळी तीही तिचं स्त्रीपण विसरते, कधी धक्के देते, कधी धक्के खाते, गर्दीत स्वतःच अस्तित्व विसरते, कधी स्त्रीपणाचा वापर करून सोयी-सवलती, प्रसिद्धी मिळवते. धकाधकी आणि स्पर्धेच्या या जगात आपलं सौंदर्य कृत्रिम मार्गानं टिकविण्याची या स्त्रीची केविलवाणी धडपड पाहताना -

"वयाची उंची कापता-कापता
आयुष्याचेच बॉन्साय झाले" (बॉन्साय)



Scanned with CamScanner

अशी खंत कवयित्री इथे करते, बाहेरच्या जगातील संघर्षांना तोंड देणाऱ्या या स्त्रीचं घरातलं आयुष्यही तेवढचं संघर्षमय झालं आहे. कधी या संघर्षाच अंतिम टोक म्हणून केवळ राहण तिच्या नशिबी येत आहे, तर कधी कुटूंबात राहूनही प्रचंड एकटेपणा तिच्या वाट्याला येतो आहे. आधुनिक जगातील नोकरदार स्त्री मराठी कवितेमध्ये प्रथमत:च इथे रेखाटली गेली आहे.

या सोबतच आसावरी काकडे यांच्या 'आरसा' (१९९०) व 'आकाश' (१९९१) या दोन्ही कवितासंग्रहातील काही कवितांमध्ये स्त्रीच्या माणूस म्हणून असलेल्या भूका आणि त्या पूर्ण न झाल्याने, होणारा मनाचा कोंडमारा याचं चित्रण व्यक्त झालेलं आहे, तसेच अंजली पेंडसे यांच्या 'छेद मनाचे' (१९९१) या कवितासंग्रहातून स्त्री मनाला आपलं मनच, आपल्या स्वातंत्र्याचं वैरी आहे, अशी पदोपदी जाणिव होत आहे. 'मानुषी' अर्चना वर्मा (मे-जून १९९०) यांच्या कवितेतून घराचा अर्थ 'पिंजरा' असा पहावयास मिळतो आहे. अर्थात स्त्री कवींच्या कविता ह्या वर्षानुवर्षे चक्राकार वर्तुळातच फिरत आहेत. त्यांना धक्का मारण्याची छोटीशी बंडखोरी स्त्रीवादी कविता करत आहे. मात्र ही बंडखोर कविता नाही.

स्त्रीवादी कवितेने मुळातच आपला ठसा अजून अशा प्रकर्षाने उठविलेला नाही; पण स्त्रीवादाची भूमिका स्त्रीला माणूसपणाकडे नेणारी व वर्षानुवर्षे चालू राहणारी असल्याने हा प्रवाह सतत वाहत राहील. स्त्रीयांचे शिक्षण, आर्थिक स्वावलंबन, बुद्धिच्या क्षेत्रातील सहभाग आणि समाज व कुटुंब जीवनात तिला मिळणारे दुय्यमत्व, लैंगिक अत्याचार व कोंडमारा, स्त्रियांच्या प्रश्नाची समाजाला प्रकर्षाने न होणारी जाणीव, यांच्या सततच्या वाढत्या, संघर्षाचा अविष्कार अशा कवितांतून पुढे येईल. स्त्रीला पुरुषांइतकेच बरोबरचे स्थान मिळाले ही इतकी दूरची व वर्षानुवर्षे चालणारी आणि तरीही अशक्यप्राय वाटणारीच गोष्ट असल्याने हा लढा चिरकाल टिकणारा आहे, यात शंका वाटत नाही.

पुष्कळदा प्रचारकी थाटाची ही कविता होऊन, आपले काव्य गमावताना दिसते. चलनी नाण्याप्रमाणे स्त्रीमुक्ती वगैरे शब्द, निरर्थकपणे वापरलेले दिसतात. त्याचप्रमाणे काही ठराविक विषय, कल्पना यांच्याभोवतीही या कविता फिरताना दिसतात, अशा कविताना मागणी असल्यामुळे अनुकरणातूनही बऱ्याच कविता लिहिल्या गेल्या असाव्यात असेही वाटते.

**संदर्भ ग्रंथ**

१) सिमा द. बुवा ., १९५३, द. सेकंड सेक्स, बॅन्टन बुक्स (१९६१),

२) जोआना बंकर रोह खॉं, १९८०, वुमेन सायकॉलॉजीज पझल, ॲबॅकस एडिशन, स्फिअर, बुक्स लिमिटेड,

Scanned with CamScanner